**प्रेस नोट** दिनांक १५/०७/२०२२

**सशस्त्र जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना गुन्हा घडल्यापासुन २४ तासांच्या आत अटक केले बाबत**

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | वि.प मार्ग पोलीस ठाणे, मुंबई |
| **गु.र.क्र. व कलम** | गु.र.क्र. ४२०/२२ कलम ३४१, ४४८,४५२,३९४,३४ भादवि सह कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा. |
| **दाखल दिनांक** | दिनांक १४/०७/२२ रोजी १६.३० वाजता. |
| आरोपी | १) करीम रफीक शेख वय २३ वर्षे, पत्ता:- एस.आर.ए बिल्डींग, २ रा माळा, जामा मस्जिद जवळ, बंदरपाडा, बोळींज विरार (प), ता. वसई जिल्हा- पालघर<br>२) नूर मोहंम्मद मिठाईलाल शेख, वय २५ वर्षे, पत्ता:- १६९, मनीषा नगर, साईबाबा नगर, बुध्द विहार जवळ, कळवा (प); मुबई मधिल पत्ता:- इंदीरानगर झोपडपट्टी, हाजीबंदर रोड, फॉसबेरी रोड, शिवडी, मुंबई |

दि. १४/०७/२०२२ रोजी दोन आरोपीत इसमांनी आपसात संगणमत करुन फिर्यादी हे त्यांचे ऑफीसमध्ये बसले असताना फिर्यादीस दुखापत करण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचे ऑफीसमध्ये अनधिकाराने प्रवेश करुन, त्यांचेकडे पैशांची मागणी केली. फिर्यादी यांनी त्यास नकार देताच जबरदस्तीने त्यांचे तोंडात कापडाचा बोळा कोंबुन व अग्निशस्त्रा सारख्या हत्याराने त्यांचे डोक्यावर मारुन, त्यांना दुखापत करुन, त्यांचे ॲपल कंपनीचा मोबाईल फोन, ॲपल कंपनीचे वॉच व रोख रक्कम असा एकूण रू.५४,०००/- किंमतीचा ऐवज जबरी चोरी करुन चोरुन नेला म्हणुन दिलेल्या तक्रारीवरुन वि.प. मार्ग पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ४२०/२२ कलम ३४१, ४४८,४५२, ३९४, ३४ भादंवि सह कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने या गुन्हयातील आरोपींचा शोध घेणेकामी तातडीने हालचाली करुन, वि. प. मार्ग पोलीस ठाण्याने गून्हेगारांचा मागोवा घेणारी व तांत्रिक तपास करणारी वेगवेगळी पथके तयार करुन, गुन्हा घडल्यापासुन रांत्रदिंवस सातत्यपुर्वक तपास करुन, आरोपींचा छडा लावुन एकास वसई, पालघर व दुसऱ्यास शिवडी, मुंबई येथुन ताब्यात घेतले असुन, त्यांना २४ तासांचे आत दि.१५/०७/२०२२ रोजी अटक करण्याची चांगली कामगीरी पथक प्रमुख व.पो.नि. किशोर शिंदे व त्यांचे सहकारी पो.नि. सागवेकर, स.पो.नि अमित भोसले, स.पो.नि. अविनाश शिंदे, पो.उ.नि अभिजीत देशमुख, पो. उ.नि. बोरसे, पो.ना.क्र.०३११२५/परब, पो.ना.क्र.०५०१२९/ मेळवणे, पो.ना.क्र.०५०१७५/ जाधव, पो.शि.क्र.११०९८९/ शेख, पो.शि.क्र.१११२९८/ जाधव, पो.शि.क्र.१३०८३७/ कांडेकर व पो.ना.क्र.०३५०५/ मुन्ना सिंग (तांत्रिक तपास) यांनी केली आहे.

नमूद जबरी चोरी करण्याकरीता आरोपींनी वापरलेले हत्यार व त्यांनी फिर्यादी यांची जबरीने चोरलेली रोख रक्कम हस्तगत करण्यात आली असुन फिर्यादी यांचा ॲपल कंपनीचा मोबाईल फोन, ॲपल कंपनीचे वॉच हस्तगत होणेकामी आरोपींतांची पोलीस कोठडी रिमांड मिळणेकरीता त्यांना उदया मा. न्यायालयात हजर ठेवण्यात येणार आहे.

सदरची चांगली कामगीरी चांगली कामगिरी मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, मा. पोलीस सह आयुक्त (कावसु) बृहन्मुंबई, मा. अपर पोलीस आयुक्त (द.प्रा.वि) बृहन्मुंबई, मा.पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-२) बृहन्मुंबई, मा. सहायक पोलीस आयुक्त (गिरगाव विभाग) बृहन्मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वि.प मार्ग पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर शिंदे व त्यांचे सहकारी पो.नि. सागवेकर, स.पो.नि अमित भोसले, स.पो.नि. अविनाश शिंदे, पो.उ.नि अभिजीत देशमुख, पो. उ.नि. बोरसे, पो.ना.क्र.०३११२५/परब, पो.ना.क्र.०५०१२९/ मेळवणे, पो.ना.क्र.०५०१७५/ जाधव, पो.शि.क्र.११०९८९/ शेख, पो.शि.क्र.१११२९८/ जाधव, पो.शि.क्र.१३०८३७/ कांडेकर व पो.ना.क्र.०३५०५/ मुन्ना सिंग (तांत्रिक तपास) यांनी केली आहे.